# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) (अनुक्रमांक १):-**

**(१) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३३ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मौजे कोंडीविटा, तालुका अंधेरी येथील झोपड्या विकास आराखडयानुसार रस्ता रुंदीकरणाकरिता निष्कासित करण्यात आल्याबाबत.

**(२) श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३७ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

स्मार्ट सिटी योजनेच्या अंतिम टप्प्यात नागपूरसह अनेक शहरांना वगळणे, प्रकल्प हस्तांतरणातील अनियमितता व महाराष्ट्रातील स्मार्ट सिटी अंमलबजावणीतील अपयशाबाबत.

**(३) श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३८ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

कोल्हापूर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे कामकाज २० दिवसांपासून ठप्प असल्याबाबत.

**(४) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३९ वर अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री निवेदन करतील**

राज्यात घरगुती व्यावसायिक गॅस सिलिंडरचे भाव वाढल्याबाबत.

अग्रिम प्रत

**(५) श्री. मिलिंद नार्वेकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३४ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अपूर्ण असतानाही प्रवास करताना पहिल्या टप्प्यात प्रवाशांना दोन वेळा टोल द्यावा लागणार असल्याबाबत.

**(६) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३६ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

डहाणू, जि.पालघर, येथील उपजिल्हा रुग्णालयात गर्भवतींची गैरसोय होत असल्याबाबत.

**तीन : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] –**

(१) **श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोल्ड व्हॅल्युअर्स (सोनार) हे देशातील बँकिंग व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असणे, सुवर्ण कर्ज (Gold Loan) वितरण प्रक्रियेत अचूक, पारदर्शक व जबाबदार मूल्यांकन करण्याची जबाबदारी ही पूर्णतः गोल्ड व्हॅल्युअर्सवर असणे, सोन्याच्या वाढत्या किंमती, जोखीम, फसवणूक प्रतिबंध, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि बँकांच्या कठोर ऑडिट प्रक्रियेमुळे आज गोल्ड व्हॅल्यूएशनची जबाबदारी अनेक पटींनी वाढणे, RBI च्या निर्देशांची पायमल्ली करणे, गोल्ड व्हॅल्यूएशनची स्टँडर्ड ऑपरेटिव्ह प्रोसिजर बनवून व्हॅल्युअर्सना न देणे, कर्जदाराने आणलेल्या ऐवजाच्या मालकीची तपासणी न करणे, संशयास्पद ऐवजाच्या मालकीबद्दल शपथेवर प्रमाणपत्र न घेणे, KYC ची प्रभावी अंमलबजावणी न करणे, एवढ्या गोष्टींचे काटेकोर पालन केल्यास बँकांतून खोटे दागिने तारण ठेवण्याचे प्रमाण ९० टक्के कमी होणे, १० लाखाचे व्हॅल्यूएशन झाल्यास सोनाराला फक्त ३५० रुपये मिळणे, प्रचलित फी मध्ये सोने भाववाढ व जोखमीच्या मानाने किमान ३० टक्के फी वाढ अपेक्षित असताना खाजगी बँकेने मनमानीपणे व्हॅल्युअर्सना विश्वासात न घेता ६० टक्के फी कमी करून व्हॅल्युअर्सना आर्थिक संकटात टाकलेले असणे, करारनाम्यांमध्ये समतोल व परस्पर जबाबदारी असावी लागणे, मराठी भाषेतील अधिकृत व प्रमाणित करार मसुदा उपलब्ध करणे आवश्यक असणे, फी संरचनेबाबत सल्लामसलत करून पुनर्विचार करण्यात येणे आवश्यक असणे, अमर्यादित Indemnity कलमे रद्द करून वाजवी व मर्यादित जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असणे, व्हॅल्युअर्सना मिळत असलेल्या फीच्या पटीतच

जबाबदारी निश्चित व्हावी इत्यादी बाबींवर गंभीर्याने लक्ष देऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोरेगांव (जि.सातारा) येथील पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांच्याकडून पदाचा गैरवापर करुन शहरात मनमानी कारवाया सुरु असणे, कोणताही गुन्हा केलेला नसताना निरपराध कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणे, पक्षपातीपणा करणे, गुंड प्रवृत्तीस पाठबळ देणे, अवैध धंद्यांना पाठीशी घालणे, आदी प्रकार सुरु असणे, नुकतेच मौजे आसरे ता.कोरेगांव येथील महिला सरपंच व अन्य व्यक्ती यांच्यावर गावातील गटाराच्या कामावरुन २५ ते ३० लोकांनी दिनांक ०९ जानेवारी,२०२६ रोजी जीवघेणा हल्ला करुन जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, हल्ला केलेल्या आरोपींवर किरकोळ स्वरुपाची कलमे लावण्यात येणे, ज्या हल्लेखोरांनी/आरोपींनी मारहाण केली त्याच व्यक्तींनी या विरोधात तक्रार दाखल करणे, गुन्हा झालेल्या ठिकाणी उपस्थित नसताना गावातील लोकांवर गुन्हा दाखल करणे, आरोपी मोकाट फिरत असणे, ज्यांनी गुन्हा केला नाही ते गावाबाहेर अशी परिस्थिती असणे, हल्ल्याला राजकीय स्वरुप देणे, कोरेगांव शहरामध्ये अवैध धंद्यांना प्रोत्साहन देऊन कारवाई न करता गुन्हेगारीला खतपाणी घालण्याचे काम पोलीस निरिक्षक करणे, कोरेगांव शहरातील अनेक गुन्ह्यांचा तपास अद्याप झालेला नसणे, तसेच दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजीचा गु.र.नं. ३२२/२०२५ या गुन्ह्यांमध्ये छापा टाकण्यासाठी स्पोर्टसचे ड्युटीवर असणारे पोलीस यांनी छापा टाकलेला असतानाही कागदोपत्री उल्लेख नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कोरेगांव पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक यांच्या कारवायांबाबत शासनाने सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत**, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पिंपरी चिंचवड महानगरात मेट्रो, नदी सुधार, पर्यटन विकास व पाणीपुरवठा प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नसणे, पोलीस आयुक्त इमारतीची जागा, न्यायालय इमारत, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, आदी प्रकल्प प्रस्तावित असणे, मुंबई-बंगळुरू महामार्गावरील किवळे ते वाकड या रस्त्या संदर्भातील पाच हजार कोटींचा प्रस्ताव प्रलंबित असणे, शहरात दिवसाआड पाणीपुरवठा होत असणे, पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प पुनर्जीवीत करणे, मुळशी भागातून पाणी आणणे, प्राधिकरणाचे महानगरपालिकेत विलीनीकरण झाल्यानंतर ४० पेठांमधील विकसित भाग महानगरपालिकेत गेला असून तेथील नागरिकांना

प्रॉपर्टी कार्ड देणे, मावळमधील लोणावळा, खंडाळा पर्यटन विकास, तीर्थक्षेत्र विकास, पीएमआरडीएच्या चाकण, हिंजवडी आणि मावळ मधील रस्ते विकासाला निधी देणे इत्यादी कामे प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून पुणे शहरातील समाविष्ट झालेल्या नवीन गावांतील एकूण चार नगररचना योजनांचा समावेश असणे, त्यामध्ये वडाचीवाडी नगररचना योजना क्रमांक दोन, अवताडे हांडेवाडी नगररचना योजना क्रमांक तीन, होळकरवाडी नगररचना योजना क्रमांक चार व होळकरवाडी नगररचना योजना क्रमांक पाच यांचा समावेश असणे, या सर्व योजनांना माहे जुलै, २०२५ च्या दरम्यान मंजुरी मिळालेली असणे, साधारणतः ५०० हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्राची ही योजना मंजूर होणे, योजना मंजूर होऊन सहा महिने झाले तरी अद्यापपर्यंत यावर कोणतीही कार्यवाही न होणे, सदर क्षेत्राची मोजणी किंवा इतर प्रशासकीय बाबी अद्यापही सुरू झालेल्या नसणे, त्यामुळे रिंग रोडचे कामही प्रलंबित असणे, या योजनेतील गावे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्याने ही योजना महानगरपालिकेने करायची की पीएमआरडीएने करायची याचा निर्णय अजून झालेला नसणे, त्यामुळेच सदरची योजना रखडलेली असणे, ही योजना लवकरात लवकर सुरू करून पूर्ण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप**, प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्र, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे कार्यरत असलेल्या लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड या रसायन उत्पादक कंपनीच्या कारखान्याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये पर्यावरणीय सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर चिंता व्यक्त होत असणे, सदर कंपनीकडून फ्ल्युरिनयुक्त व इतर रासायनिक उत्पादने तयार केली जात असून त्यातून निर्माण होणारे सांडपाणी व घातक कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबत परिसरातील नागरिक, पर्यावरणप्रेमी व सामाजिक संघटनांकडून प्रश्न उपस्थित केले जात असणे, कंपनी व्यवस्थापनाच्या म्हणण्यानुसार PFAS संबंधित कोणतेही अनियंत्रित उत्पादन, सोडवणूक किंवा विल्हेवाट कंपनीकडून केली जात नसणे, इटली देशासारखी परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये, याकरिता भारत सरकारने पर्यावरण अनुमती देताना भारतात अस्तित्वात नसलेल्या कठोर कायद्यातील PFAS प्रदुषणाबाबत विचार करुन तसेच जागतिक पातळीवर PFAS उत्पादनांवर व त्या संबंधित उत्पादनांवर येत

असलेला बंदीचा विचार करुन येथे PFAS संबंधित उत्पादनांवर बंदी घालणे, कंपनीने पर्यावरणीय नियमांचे पूर्ण पालन होत असल्याचा दावा केला असला तरी यासंदर्भात प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असणे, नागरिकांच्या आरोग्य व पर्यावरण सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने तात्काळ लक्ष घालून योग्य ती कारवाई करणे आवश्यक असतानाही शासन याबाबत दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने त्वरीत लक्ष घालून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आर्किटेक्चर व इतर उच्च तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून विविध योजनांतर्गत शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परतावा देण्यात येत असणे, मात्र गेल्या काही वर्षांपासून या शिष्यवृत्तीची रक्कम मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याची बाब निदर्शनास येत असणे, अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा होत असणे, संबंधित महाविद्यालयांकडे ती रक्कम जमा होत नसल्यामुळे विद्यार्थी व महाविद्यालय यांच्यात वाद होत असणे, तसेच महाविद्यालयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, गेल्या सुमारे ९ वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर NT/OBC विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे महाविद्यालयांचे नियमित खर्च, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, तसेच शैक्षणिक सुविधा पुरविणे यावर गंभीर परिणाम होत असणे, आर्थिक ताणामुळे काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे (Documents) अडवून ठेवण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी देखील समोर येत असणे, परिणामी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, नोकरी किंवा प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**पाच : शासकीय विधेयके –**

**(क) विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२६"

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**सहा : (मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६, बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६, गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ व शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, चंद्रकांत रघुवंशी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री इद्रिस नायकवडी, अमरिशभाई पटेल, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, विक्रांत पाटील, दादाराव केचे, संदीप जोशी, योगेश टिळेकर, संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"दावोस मध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावरहाऊस' झाले असणे, १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी

झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, "माझी वसुंधरा अभियान" राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याकरिता आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ व शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

(२) **श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरु असलेले युध्द, या युध्दजन्य परिस्थितीमुळे राज्यात अत्यावश्यक वस्तू तसेच सर्वसामान्य जनतेशी निगडीत असलेले पेट्रोल, डिझेल, वाणिज्य गॅस यांचा निर्माण झालेला तुटवडा, यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असणे, या वस्तूंचा होत असलेला काळाबाजार तसेच शेतीशी संबंधित केळी, कांदा व द्राक्ष इत्यादी निर्यात मालाचे कंटनेर बंदरात पडून असणे, या नाशवंत मालामुळे शेतकऱ्यांच्या बाजारात येणाऱ्या मालाला कवडी मोलाचा भाव मिळणे, परिणामी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याने शेतकरी उध्वस्त होणाच्या मार्गावर असणे, युध्दजन्य परिस्थितीमुळे परदेशात अडकलेले राज्याचे नोकरदार व पर्यटक यांच्यासंदर्भात करावयाची उपाययोजना, राज्यात कामगार संहिता लागू केली असून या चार संहिता स्वीकारल्यामुळे कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असणे, या कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी सभागृहाचे विरोधी पक्षातील सदस्य व कामगार नेते यांच्यासह काही सदस्यांची समिती नियुक्त करुन या विषयावर सर्वंकष विचारविनिमय करणे, आरोग्य विभागात औषध खरेदी, औषध पुरवठ्यातील

घोटाळे आणि डॉक्टरांची अनुपस्थिती यासारख्या गंभीर अनियमितता आढळल्याने राज्यात आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया तसेच करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**सात : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार निर्माण झाला असणे, या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नवीन पदनिर्मिती तसेच रिक्त होणाऱ्या पदांच्या भरतीवर काही काळासाठी बंदी घातली असणे, तथापि शिक्षकांची पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने मानधन तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असणे, त्या अनुषंगाने तीन वर्षांच्या कालावधीसाठी मानधनावर नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना "शिक्षण सेवक" असे नामाभिधान देण्यात आले असणे, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने शिक्षकांचे होत असलेले आर्थिक शोषण अमान्य असल्याचे स्पष्ट केले असणे, त्यावेळी शासनाच्या तत्कालीन प्रधान सचिवांनी न्यायालयास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे "शिक्षण सेवक योजना" ही तात्पुरत्या स्वरूपाची असून राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतर ही योजना रद्द करण्यात येईल, असे आश्वासन दिले असणे, मात्र शासनाकडून सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रातील आश्वासनाचा विसर पडल्याचे दिसून येत असणे, शिक्षण सेवक योजना सुरू होऊन जवळपास दोन तपांचा कालावधी होऊनही शिक्षकांचे आर्थिक शोषण करणारी ही योजना अद्याप सुरू असल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच शिक्षकांच्या रिक्त पदांच्या भरतीवर दिनांक २ मे, २०१२ पासून सातत्याने घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे अनेक शिक्षकांचा सेवाप्रवेश उशिरा होत असणे, परिणामी सेवेत दाखल होण्याची कमाल वयोमर्यादा गाठण्याच्या अवस्थेत शिक्षकांना नोकरी मिळत असून २० ते २५ वर्षांच्या एकूण सेवाकाळामधील पहिली तीन वर्षे अत्यल्प मानधनावर "शिक्षण सेवक" म्हणून काम करावे लागत असणे, यामुळे शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नैराश्य, अनास्था तसेच भविष्यासंबंधी असुरक्षिततेची भावना निर्माण होत असणे, या पार्श्वभूमीवर शिक्षकांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी आणि त्यांच्या सेवेस योग्य न्याय देण्यासाठी "शिक्षण सेवक योजना" रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित

**(२) सर्वश्री सतेज पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासनाने प्रशासनातील तसेच महामंडळ, मंडळ व प्राधिकरणातील रिक्त पदे बाह्य यंत्रणेद्वारे आणि कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला असणे, मात्र कंत्राटी कर्मचारी यांच्याकडे कार्यक्षमता व प्रशिक्षण यांचा अभाव असणे, काही महिन्यांपूर्वी बदलापूर येथील शाळकरी अल्पवयीन मुलीवर झालेला निंदनीय अत्याचार तसेच कुर्ला व भांडुप येथे झालेले बेस्ट बसेसचे दुर्दैवी अपघात या घटनेमधील आरोपी कंत्राटी तत्वावर कार्यरत असणे, ही बाब विचारात घेता शासनाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कंत्राटी भरतीबाबत पूर्ण विचार करुन कायम पद भरतीबाबत विचार करण्याची गरज असणे, त्यामुळे प्रशासनातील तसेच महामंडळ व प्राधिकरणांतर्गत रिक्त पदाच्या कायम भरतीबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ मार्च, २०२६

**डॉ.विलास आठवले,**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रधारित प्रत